हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई येथील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती उपदान व मृत्यू उपदानामध्ये वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्र.एचएनएफ-२०२२/प्र.क्र.२४/२२/औषधे-१

मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल इमारत

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१

दिनांक: - १८.०८.२०२६

संदर्भ:- १. केंद्र शासनाचा पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी (सुधारित) कायदा १९९८/क्र.११/१९९८, दि.२२.०६.१९९८,

२. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र.एचएनएफ-२०१९/प्र.क्र.६५/१९/औ-१, दि.२५.१०.२०१९,

३. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र.एचएनएफ-२०२२/प्र.क्र.२४/२२/औ-१, दि.२५.११.२०२२,

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.सेनिवे-२०२२/प्र.क्र.८५/सेवा-४, दि.१०.१०.२०२४,

५. संचालक, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई यांचे पत्र क्र.हासं/प्रशासन/२०२४/३६११, दि.०५.१२.२०२४

प्रस्तावना:-

हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, परळ, मुंबई येथील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती व मृत्यू उपदानाची रक्कम रु.०७ लाखावरुन रु.१४ लाखापर्यंत वाढविण्यास संदर्भ क्र.३ येथे नमूद दिनांक २५.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. दिनांक ०१.०९.२०२४ पासून केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदानाची कमाल मर्यादा रु.१४.०० लाखावरुन रु.२०.०० लाखापर्यंत वाढविण्याबाबत वित्त विभागाने संदर्भ क्र.४ येथे नमूद दिनांक १०.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतला आहे. त्यानुसार हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, परळ, मुंबई येथील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती व मृत्यू उपदानाची कमाल मर्यादा रु.१४ लाखावरुन रु.२० लाखापर्यंत वाढविण्याबाबत संचालक, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई यांनी संदर्भाधीन क्र.५ दिनांक ०५.१२.२०२४ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली आहे. त्यानुषंगाने हाफकिन संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती/मृत्यू उपदानाच्या कमाल मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, परळ, मुंबई येथील कर्मचाऱ्यांना वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.४ येथे नमूद दिनांक १०.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०९.२०२४ पासून

सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदानाची कमाल मर्यादा रु.१४.०० लाखावरुन रु.२०.०० लाख इतकी वाढविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५३५/२०२६/व्यय-१३, दि.२४.०७.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदरहु शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८१८१३०६०४८५५५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SHANTARAM RAMCHANDRA GHOGARE

Digitally signed by SHANTARAM RAMCHANDRA GHOGARE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=EAB437756E4CC1E6940217B9B41A7270D1E8E05ED3D68B36C0E047115917DC5F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B9C8FB2C7E055C70D6DF2C1AAF8D20898166F951CDED38C31E97FB05C0A66424, cn=SHANTARAM RAMCHANDRA GHOGARE
Date: 2026.08.18 16:54:02 +05'30'

(शांताराम घोगरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. संचालक, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, परळ, मुंबई ४०० ०३२.
२. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
५. वित्त विभाग, (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई,
६. कक्ष अधिकारी (अलेप), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. निवडनस्ती (औषधे-१)